



REFBK-0011981

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५२९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

REFBK-0011981



थुइ थुइ

# नाच मोरा

शान्ता ज. शेळके

श्यामल प्रकाशन

प्रकाशक :
ल. मो. प्रभुणे
इब्राहिम बिल्डिग,
तुळशी पाईप रोड, दादर, मुंबई २८

: मुद्रक
मा. ह. पटवर्धन
**संगम प्रेस प्रा. लि.**
३८३ नारायण पेठ, पुणें २.

सर्व हक्क
लेखिकेच्या स्वाधीन

: चित्रें
चंद्रकान्त ठाकूरदास

**मूल्य सव्वा रुपया**

एकमेव विक्रेते

**आदर्श बुक डेपो, मुंबई २८**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३१४९८ वि: ......
क्रमांक १४२८ नों: दि: ......

# प्रास्ताविक

'चिमणचारा' या बालवाचकांसाठीं लिहिलेल्या कविता-संग्रहानंतर अल्पावधींतच 'थुई थुई नाच मोरा' हा दुसरा कवितासंग्रह बालवाचकांच्या हातीं देतांना मला अतिशय आनंद वाटत आहे. 'चिमणचारा'मधील कविता अगदीं छोटया मुलांसाठीं होत्या. 'थुई थुई नाच मोरा'मधील कविता त्यांच्या मोठया भावंडांसाठीं आहेत. 'चिमणचारा'-प्रमाणेंच 'थुई थुई नाच मोरा' या पुस्तकाचेंहि माझ्या चिमुकल्या वाचकांकडून स्वागत होईल अशी मला आशा वाटते.

येथील एक होतकरू चित्रकार श्री. चन्द्रकान्त ठाकूरदास यांनीं या पुस्तकांतील चित्रें मोठया हौसेनें काढलीं. त्यांचे मी आभार मानतें.


'संगम प्रेस'चे श्री. माधवराव पटवर्धन यांनीं पुस्तकाची आकर्षक सजावट व सुबक छपाई केली व 'श्यामल प्रकाशन'नें तें प्रकाशित केलें. या उभयतांची मी मनापासून आभारी आहें.

दि. २५ एप्रिल, १९६१
दादर, मुंबई २८

— शान्ता ज. शेळके

## कवितांचा अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ थुई थुई नाच मोरा | ... | ५ |
| २ सोनुली | ... | ७ |
| ३ बाहुलीची अंगाई | ... | ९ |
| ४ रुसवा | ... | ११ |
| ५ चिमुकले परी | ... | १३ |
| ६ मनीचीं बाळें | ... | १५ |
| ७ फूलपांखरा | ... | १७ |
| ८ बघ आई ! | ... | १८ |
| ९ पाऊस | ... | १९ |
| १० हिरवळ | ... | २२ |
| ११ झाडें नसतीं तर— | ... | २४ |
| १२ आमची बाग | ... | २६ |
| १३ सांजवेळ | ... | २८ |
| १४ वाटे मिटावें पुस्तक | ... | ३० |
| १५ भांडण | ... | ३२ |
| १६ छुम छुम | ... | ३५ |
| १७ चिमणीं चिमणीं मुलें | ... | ३७ |
| १८ भारतमाता | ... | ३९ |



## थुई थुई नाच मोरा !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११६८७

थुई थुई नाच माझ्या अंगणांत मोरा
निळ्या निळ्या पिसाऱ्याचा फुलव फुलोरा !

काय तुझ्या पिसाऱ्याचा सांगूं मी दिमाख ?
निळ्या मखमलीवर हिरे लाख लाख !

रंगी बेरंगी छटांनीं झळाळतें अंग
काय इंद्रधनुष्याचे चोरीयले रंग ?

डोईवर चिमुकला डोलतसे तुरा
साऱ्या पांखरांचा राजा शोभतोस खरा !

मान उंच उभारून फोडिसी का टाहो ?
ढगांना कां बोलावीसी ‘या हो या हो या हो’ ?

आल्या बघ वरतून सळ सळ धारा
नाच आतां उभारून सुंदर पिसारा

थुई थुई नाच माझ्या अंगणांत मोरा
भव्य तुझ्या पिसाऱ्याचा फुलव फुलोरा !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे (...)
अनुक्रम ........................ विः ........................
क्रमांक ........................ नों: दि: ....................






# सो नु ली

माझ्या सोनुलीचा
केवढा थाट
रेशमी साडीला
जरीचे कांठ

बुट्टयांच्या चोळीचा
केशरी रंग
पाचूंच्या बिंदीनें
भरला भांग

कानांत डुलती
हिऱ्यांचे डूल
केसांत खोवीलें
चांफ्याचें फूल

वेणीला लावीले
हिरवे गाडे
हातांत भरले
तांबडे चुडे

काजळ कांठांनीं
शोभती डोळे
पायीं झणाणती
सांखळ्या वाळे

कपाळीं रेखिली
चंद्राची कोर
गळ्यांत रुळती
मोत्यांचे सर

पोर ही सुंदर
गोजिरवाणी
कोणत्या राजाची
व्हायची राणी !



# बाहुलीची अंगाई

आज माझ्या बाहुलीची
झोंप कुठें गेली बाई ?
रात्र किती झाली तरी
डोळा मिटीतच नाहीं !





हिला गाइली अंगाई
आंदुळलें मांडीवरी
कडेवर घेउनिया
हिंडाविलें घरभरी

मांडियला खेळ पुढें
वाजविला खुळखुळा
तरी झोंपेचना वेडी
रडे काढुनीया गळा

रस्त्यावरचा गोंगाट
आहे मघाच संपला
निंबोणीच्या झाडामागें
चांद कधींच झोंपला

सारें झालें सामसूम
नाहीं मुळीं जागें कुणी
गडे, झोप ना तूं आतां ?
बाळ माझी आहे गुणी !

आला बागूल दाराशीं
सांग, बोलावूं मी त्याला ?
अगबाई, सोनुलीचा
डोळा लगेच लागला !



# रुसवा




रडरडूनिया झाले डोळे दोन्ही लाल
बाई डोळे दोन्ही लाल
कोमेजून गेले तुझे गुलाबी हे गाल

लाडक्या या बाहुलीला जवळ न घेसी
गडे जवळ न घेसी
भातुकलीचाहि खेळ दूर झुगारीसी

कुरळे हे केस सारे अस्ताव्यस्त झाले
सारे अस्ताव्यस्त झाले
कपाळींचें कुंकूं बघ विस्कटून गेलें

पुशीले तरीहि डोळे भरून येतात
पुन्हां भरून येतात
ओठांच्याहि पाकळ्या ग थरथरतात

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३२४९८ वि: काव्य
क्रमांक ९४२८ नों: दि: १३/१०/४९

किती विचारलें तरी उत्तर देशी न
मुळी उत्तर देशी न
मुका घेऊं जातां आणि फिरवीशी मान

सोनुले ! हा रुसवा ग कधीं सरायचा
सांग कधीं सरायचा
फुगलेला गाल सांग कधीं हंसायचा ?





# चिमुकले परी

चिमुकले परी, गात अन् नाचत
ये ग माझ्या घरीं, ये माझ्या बागेंत

रुपेरी पंखांची पाठीवर जोडी
गुलाब फुलांच्या पाकळ्यांची साडी

मुकुट चंदेरी झगमगे शिरीं
अशा थाटामध्यें येई माझ्या घरीं

जादूची ती कांडी घेऊन हातांत
चांदण्यामधून ये माझ्या बागेंत

फुलपांखरांच्या मऊ पाठीवरी
बसून अथवा येई माझ्या घरीं


जादूनें आपुल्या मजलाही करी
तुझ्यासारखीच चिमुकली परी


तुमच्या राज्यांत नेई गे मजला
शोभा ती पहाया जीव हा भुकेला

तुमच्या राज्यांत पऱ्यांच्या संगतीं
नाचेन खेळेन करीन गंमती

परंतु पडेल काळी रात्र जेव्हां
रूप माझें पुन्हां पालटून तेव्हां

आणून पोंचव मला माझ्या घरीं
आईच्या कुशींत झोंपेन सत्वरीं !






# मनीचीं बाळें

एक होती मनूताई
तिला होतीं चार पिलें
तीन होतीं पांढरीं शुभ्र
एक होतें काळें काळें

पांढरीं पिलें होतीं शहाणीं
काळें होतें अगदीं वेडें
पांढरीं पिलें अभ्यास करीत
काळ्याचे पाठच नसत धडे !

पांढरीं पिलें चाटून चाटून
साफ करीत आपलें अंग
काळें मात्र बघावें तेव्हां
धुळीमध्यें लोळण्यांत दंग

पांढऱ्या पिलांचे केस होते
रेशमासारखे मऊ छान
काळ्याचे केस विस्कटलेले
अंगावरतीं नेहमीं घाण !


पांढरीं पिलें आईजवळ
देवासारखीं बसून राहत
आई सांगेल तसें वागत
आई देईल तेंच खात


काळें मात्र अशा वेळीं
सरसर वरतीं चढून जाई
कौलारावर ऊन खात
रस्त्यावरची गंमत पाही

रात्र होतां पांढरीं पिलें
झोपीं जात आईपाशीं
काळें पिलूं शोधीत बसे
झुरळें, पाली, उंदीर, घुशी

पहांट होतां काळें पिलूं
आईच्या कुशींत बसे घुसून
मनी त्याचें मळकें अंग
स्वच्छ करी चाटूनपुसून

त्याचें अंग पुसतां पुसतां
मनीच्या डोळ्यांत पाणी येई
म्हणे "काळें अगदीं वेडें
याचें कसें व्हायचें बाई!"





# फू ल पां ख रा

फूलपांखरा ! फूलपांखरा !


इथें थबकशी तिथें चमकशी
फुलांफुलांतुन गुंगत फिरशी
मित्र तयांचा गमसि तूं खरा
फूलपांखरा ! फूलपांखरा !

पंख तुझे हे मखमालीचे
ठिपके त्यांवरतीं रत्नांचे
वनराणीचा जणूं बिजवरा
फूलपांखरा ! फूलपांखरा !

इकडुन तिकडे जासी भुर्कन
कळ्या फुलांचें घेसी चुंबन
काय तुझा सांगावा नखरा
फूलपांखरा ! फूलपांखरा !


वाटे तुजला करीं धरावें
हळूंच प्रेमें कुरवाळावें
थांब लाडक्या थांब रे जरा
फूलपांखरा ! फूलपांखरा !

# बघ आई





बघ आई आकाशांत सूर्य हा आला
पांघरून अंगावर भर्जरी शेला
निळ्या याच्या महालांत खांब सोनेरी
मोतियांच्या लावियेल्या आंत झालरी
केशराचे घातले हे सडे भूवरीं
त्यावरून येई याची डौलाने स्वारी !
डोंगराच्या आडून हा डोकावी हळूं
गुलाबाचीं फुलें आणि लागे उधळूं !
नभांतून सोनियाच्या ओततो राशी
गुदगुल्या करी कसा कळ्या फुलांशी !
पाखरांच्या संगे याची सोबत छान
गाती बघ कशीं याला गोड गायन
मंद वारा जागवीतो साऱ्या जगाला
म्हणतसे " उठा उठा, मित्र हा आला "
उठलेच आणि सारे झोंप सोडुनी
मीच मग आळशी का राहूं झोंपूनी


घरापुढें हिरव्या रंगाचा
दिसे पहा किती अफाट सागर
कधि वाऱ्याची झुळूक येतां
भरभर उठती लाटा त्यावर



लपली होती कुठें आजवर--
लबाड हिरवळ, मला कळेना
पाऊस पडतां अवचित येते
मुळी तिची चाहुल लागेना




# झाडें नसतीं तर—



झाडें जर कां नसतीं येथें
कसें बरें मग झालें असतें
गरिब बिचाऱ्या पक्ष्यांनीं या
कुठें बांधलें असतें घरटें ?

झाडें जर कां नसतीं येथें
डुलली असती कशी पालवी !
बसावयाला कोठुन मिळती
थंड सांवली हिरवी हिरवी ?





झाडें जर कां नसतीं येथें
नसते आंबा, पेरु, नारळ
नसतीं केळीं, चिक्कू, पपनस
नसतें दिसलें एक गोड फळ!



झाडें जर कां नसतीं येथें
गुलाब नसते,नसत्या बकुळी
जाईजुई, प्राजक्त, मोगरा
दिसली नसती एक पाकळी !

झाडें जर कां नसतीं येथें
दिसलें असतें भयाण सारें
रुक्ष मोकळ्या माळावरतीं
फिरलें असतें भणभण वारें ?







# आमची बाग



मैत्रिणी पहा ही सुंदर अमुची बाग
उमललीं फुलें बघ कितीक जागोजाग

भाउनें लाविला गुलाब हा हौसेने
किती गेंद तयावर डुलती आनंदानें

चढविले वेल मी इथें मांडवावरतीं
या जाइजुईवर भुंगे गुं गुं करिती

डंवरला मोगरा गंध दरवळे छान
तगरींची बघतां फुलें हरपते भान

हांसतो पलिकडे झेंडूचा तो ताफा
हा सोनफुलांनीं फुलला इकडे चांफा

ही कृष्णकमळिची वेल असें ताईची
ही शेवंतीचीं रोपें असतीं माझीं

घे तुळसमंजिऱ्या आई देवपुजेला
निशिगंध तुरे किती आवडती बाळाला

किती बाग पहा ही दिसते गोजिरवाणी
टवटवी राखतो माळी घालुन पाणी

झुळझुळतां वारा गंध फुलांचा दाटे
किती इथें बसाया मौज मनाला वाटे

यावया हवें हो रोज इथें तू आतां
हीं फुलें चार जा घेऊन जातां जातां !




# सांजवेळ

सांजवेळ झाली
बाळा ये घरांत
खेळशील किती
असा अंगणांत ?

कोनांतून हळूं
अंधार ये पुढें
थकलें पांखरूं
उडे घराकडे

गोठ्यामध्यें आल्या
परतून गाई
प्रेमें वासरांना
चाटतात पाही




आभाळीं चमके
एक एक तारा
झुळझुळ वाहे
थंडगार वारा

वृन्दावनामध्यें
उजळितें वात
बाळा दिव्यापुढें
जोड बरें हात ?



# वाटे मिटावें पुस्तक

सात पंचे सांग किती ?
बाई मला विचारीती
कसें सुचावें उत्तर
बागेंतल्या वेलीवर
जेव्हा चिमण्या नाचती ?





कसें दाखवूं मी पुणें
भारताच्या नकाशांत ?
—जेव्हां ऊन ये कोवळें
मिचकावुनीया डोळे
म्हणे 'खेळ, ये बागेंत !'

बेरजा नि वजाबाक्या
कशा सुचाव्या सांगा ना ?
फुलें गोजिरीं रंगीत
माना हळूं डोलावीत
मला करितात खुणा !

'कधीं जन्मला शिवाजी ?'
नाहीं आठवत मुळीं
सळसळणारे वारे
रंगी बेरंगी पांखरें
मला करितात खुळीं

वाटें मिटावें पुस्तक
नको वर्गात बसाया
गोड निळ्या आभाळाशीं
पाना –फुलां – पांखरांशीं
जावें खुशाल खेळाया ?






# भांडण

शकू आणि ठकू झाल्या खेळामध्यें दंग्
आला चूलबोळक्यांच्या संसाराला रंग्

कोपऱ्यांत चिमुकलें शोभे घरकुल्
चिमुकलीं भांडींकुंडीं; चिमुकली चूल्

चुर्मुऱ्यांचा वाटा परी झाला नाहीं नीट्
“चोरटी तूं” शकूलागीं ठकू बोले धीट्

आल्या दोघी वर्दळीला झाली रुसारुस्
उधळला खेळ आला डोळ्यांत पाऊस् !




भांडीं घेऊनीया बसे शकू कोपऱ्यांत्
खेळ सारा ठकूनेंच घातला ओच्यांत्

वेळ जरा जातां परी मौज झाली फार्
बिळांतून एक आला छोटासा उन्दीर्

डोळे त्याचे चमकले मणी जणूं छान्
फिरवीत मिशा हलं टवकारी कान्

हलकेच आला पुढें धिट्टकला भारी
चुर्मूऱ्याचा दाणा लागे खावया स्वारी


"अय्या, शकू, बघ मजा !" ठकू बोलली
शकूनेंही आनंदानें टाळी पिटली !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३७७७८ दि: ९/०५

हळूं हळूं दोघीजणी आल्या पुढती
उंदराच्या पोराची अन् झाली भरती

भांडणाची गोष्ट गेल्या दोघी विसरूनं
पावसाच्या जागीं आतां चमकलें ऊन्






## छुम छुम छुम छुम नाचूं आपण

रुमझुम रुमझुम चला वाजवित पायामधले चाळ
छुम छुम छुम छुम नाचूं आपण गोपी अन् गोपाळ

झुळ झुळ झुळ झुळ वाहे वारा
कालिन्दीची अखंड धारा
हिरवळ हिरवी पायांखालीं निळें वरी आभाळ

ऊन सांडलें रानोरानीं
सोनें पिकलें पानोपानीं
लाल केशरी आनंदानें न्हाली सायंकाळ!

फुलल्या वेली, तरु मोहरले
पान फुलांचे गंध दाटले
तिरपीं होतां उन्हें हांसले दूरदूरवर माळ


सुखांत चरती गाइवासरें
कपिला कोणी मधुन हंबरे
वत्स लाडकें जवळी येतां चाटितसे लडिवाळ

दिवसाचे श्रम सरले आतां
दूर पळाल्या अवघ्या चिंता
मन रिझवाया, चला नाचुंया देतिल टिपऱ्या ताल

अवघ्या त्रैलोक्याचा राणा
तोच हरी हा गोजिरवाणा
मोरमुकुट शिरीं पीतांबर कटिं गळ्यामध्यें वनमाल

हातामध्यें हात गुंफुं या
कृष्णाभंवतीं फेर धरूं या
छुम छुम छुम छुम नाच रंगतां डुलतिल तालतमाल !






## चिमणीं चिमणीं मुलें

चिमणीं चिमणीं मुलें आम्ही तर गोजिरवाणीं मुलें
देवा तुझिया बागेमधलीं आम्ही चिमणीं फुलें


सोन्याचें हें ऊन आणखी चांदीचें चांदणें
झरे रुप्याचे त्यांच्या भंवतीं पांचूंचीं कोंदणें
अमुच्यासाठीं जग हें सारें तुवा असें निर्मिलें
देवा तुझिया बागेमधलीं आम्ही चिमणीं फुलें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम ३१४७८ दि: ३।८५

फुलाफळांतुन सुगंध भरले रंग पाकळ्यांतुनी
फळाफळांतुन रस ओघळती गोड अमृताहुनी
अमुच्यासाठीं रसरंगाचे पाझर तूं ओतिले
देवा तुझिया बागेमधलीं आम्ही चिमणीं फुलें

फुलें, पांखरें, सागर, पर्वत, वाऱ्याचें नर्तन
चमचमणारे तारे, झुळझुळ ओढ्याचें गायन
नवलाईची सृष्टी सारी अमुच्यासाठीं फुलें
देवा तुझिया बागेमधलीं आम्ही चिमणीं फुलें

हांसूं नाचूं उडूं बागडूं आम्ही पांखरापरीं
आनंदानें उंच भरारी घेऊं या अंबरीं
बाळपणाचें सुंदर देणें तूं आम्हांला दिलें!
देवा तुझिया बागेमधलीं आम्ही चिमणीं फुलें







# भारतमाता

प्रियकर अमुची भारतमाता
आम्ही सारीं तिचीं मुलें
रंग वेगळे, गन्ध वेगळे
तरी येथलीं सर्व फुलें

प्रिय आम्हांला येथिल माती
प्रिय हें पाणी झुळझुळतें
प्रियकर हीं डुलणारीं शेतें
प्रिय हे वारे सळसळते

प्रियकर अमुचा धवल हिमाचल
बघे भिडाया जो गगना
प्रियकर अमुचे सह्यविन्ध्य हे
प्रियकर या गंगायमुना

प्रिय आम्हांला रामकृष्ण अन्
प्रताप, विक्रम, शिवराय
व्यास, वाल्मिकी, कालिदासही
नित त्यांचे पूजूं पाय

सह्याद्रीचा काळा कातळ
टिळकवीर ते पूज्य अम्हां
शान्ति,अहिंसा,सत्य शिकवितो
गांधीजींचा नित महिमा

प्रियकर अमुची भारतमाता
वंदन आम्ही तिला करूं
या मातेचीं मुलें लाडकीं
सदा तिचा ध्वज उंच धरूं

REFBK-0011981
REFBK-0011981
अनुक्रम 39898 दि. 
क्रमांक 9428 नों. दि. 23/10/47

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ........................
क्रमांक ........................ नोंः दिः ........................